मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प
(जागतिक बँक सहाय्यित उपक्रम)
प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, कृषि

वाचा :-१) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. कृव्यप्र/४६१९/ प्रक्र. ७०/८- अे दि. ११/०९/२०१९
२) मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समिती ७ वी सभा दि.०६.०७.२०२२ चे इतिवृत्त.

मूल्यसाखळी उपप्रकल्प मंजूरी आदेश

संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये, मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाच्या प्रकल्प अंमलबजावणीस मान्यता देण्यात आली आहे.

संदर्भ क्र.२ अन्वये, मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत प्रकल्प संचालक, स्मार्ट यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समितीची ७ वी सभा संपन्न झाली.

उपरोक्त संदर्भीय सभेतील निर्णयानुसार सीतामाई शेतकरी उत्पादक कंपनी, शिरटे, तालुका वाळवा, जि. सांगली यांच्या सोयाबीनवर प्रक्रीया व खरेदीदारास विक्री करणे या उपप्रकल्पास मान्यता देण्यात येत आहे.

सदर उपप्रकल्पातील घटक निहाय समितीने शासकीय मापदंडानुसार ग्राह्य केलेली रक्कम व स्मार्ट प्रकल्पातून देय अनुदान इ. बाबींचा तपशील खालील प्रमाणे :-

अ. क्र.	तपशील	सीबीओने प्रस्तावित केलेली उपप्रकल्प रक्कम (रु.लाख)	शासकीय मापदंडा नुसार रक्कम (रु.लाख)	मापदंडा नुसार देय अनुदान (रु.लाख)	मापदंडाची योजना
१	फॅक्टरी शेड व गोदाम (५१० MT)	५८.९३	५८.७५	३५.२५	आवश्यकता व क्षमतेची तपासणी आणि SSR प्रमाणे अंदाजपत्रक व मुल्याकंनाच्या अटीवर मान्य
२	Cleaning & Grading unit (२ TPH)	१७.००			
३	Pulverizer Unit (२२" २० HP)	२०.०६			
४	Sortex Mini ५TPD	१९.२२			
५	Grain Dryer २ T (Square Vibiro ३०० kgs, Ribbon Blender, Storage Tank १० Tonnes (०५ Nos.), Pellet Mill २० HP	२५.९५	९९.२३	५९.५४	MoFPI Cereal & Grain J १
६	Installation Accessories, Electric Panel Box, Electric Fitting etc.	१७.००			
७	Weighbridge (५० Ton)	९.५०	५.८३	३.४९	Genral Utility N
८	Packing Unit	१५.२५	८.००	४.८०	MoFPI Cereal & Grain J १.११
	Sub Total	१८२.९१	१७१.८१	१०३.०८	

अ. क्र.	तपशील	सीबीओने प्रस्तावित केलेली उपप्रकल्प रक्कम (रु.लाख)	शासकीय मापदंडा नुसार रक्कम (रु.लाख)	मापदंडा नुसार देय अनुदान (रु.लाख)	मापदंडाची योजना
९	Custom Hiring Center				
९.१	Hydraulic Trolley ५ Ton	१.९५	१.५०	०.९०	कृषी यांत्रिकीकरण
९.२	ट्रॅक्टर ५५ HP	९.५८	९.५८	५.७५	
९.३	Rotavator	१.२०	०.९०	०.५४	
९.४	Multi Crop Planter	०.६०	०.६०	०.३६	
९.५	Hydralic Palti Plough	२.२७	१.००	०.६०	
९.६	Rota Ridger	२.०७	२.०७	१.२४	१० लाखाच्या आत
९.७	Paddy Multi crop Thresher	४.३५	२.००	१.२०	कृषी यांत्रिकीकरण
९.८	Heavy Drone Sprayer	८.४०	७.००	४.२०	
	Total CHC	३०.४२	२४.६५	१४.७९	
	Total A	२१३.३३	१९६.४६	११७.८८	
१०	५ % Operative Expenditure		९.८२	५.८९	
	Grand Total	२१३.३३	२०६.२८	१२३.७७	

सदर उपप्रकल्पास सोबतच्या अटी व शर्तीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

एकूण प्रकल्प किंमत:- रु.२०६.२८ लाख

मंजूर अंतर व्यवहार्यता (VGF) निधी (अनुदान):- रु.१२३.७७ लाख

सोबत- अटी व शर्ती

प्रमुख
प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा, कृषि
स्मार्ट प्रकल्प तथा कृषि संचालक आत्मा
कृषि आयुक्तालय, पुणे

जा.क्र.कृ.आ./आत्मा/स्मार्ट/मु.उ.मं.आ/ 83/२०२२
दि. 19/०७/२०२२

प्रति ,

अध्यक्ष/संचालक, सीतामाई शेतकरी उत्पादक कंपनी, शिरटे, ता. वाळवा, जि. सांगली उपरोक्त उपप्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी सुरु करावी.

प्रत :-

१) मा. प्रकल्प संचालक स्मार्ट, पुणे यांना महितीस्तव सविनय सादर.

२) विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, कोल्हापूर सदर प्रकल्पाची अंमलबजावणी व सनियंत्रण सोबतच्या अटी व शर्ती नुसार करण्यात यावे.

३) जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, सांगली सदर प्रकल्पाची अंमलबजावणी व सनियंत्रण सोबतच्या अटी व शर्ती नुसार करण्यात यावे.

उपप्रकल्प अंमलबजावणी अटी व शर्तीचे प्रपत्र

मंजुरी आदेश क्र......83/2022 दि. 19/07/2022 अन्वये सीतामाई शेतकरी उत्पादक कंपनी, शिरटे, तालुका वाळवा, जि. सांगली यांच्या सोयाबीनवर प्रक्रीया व खरेदीदारास विक्री करणे या उत्पादक भागीदारी उपप्रकल्पास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुरी देण्यात आलेली आहे.

१) समुदाय आधारित संस्थेकडील १) मार्केटेबल सरप्लस २) खरेदीदाराशी व्यक्तीश: बोलून कराराबाबतची खात्री याबाबत पीआययू, कृषिच्या उपप्रकल्पांसाठी प्रकल्प संचालक, आत्मा यांनी सत्यता तपासावी आणि अन्य पीआययूंनी त्यांच्या अधिकाऱ्यांमार्फत सत्यता तपासावी.

२) स्मार्ट प्रकल्पामध्ये सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करताना संबंधित संस्था जर यापूर्वी पोकरा व इतर योजनेचा लाभ घेतलेला असेल तर एकाच/त्याच बाबीसाठी/सुविधेसाठी पुन्हा स्मार्ट मधून अनुदानाची मागणी केलेली नाही याची खात्री प्रकल्प संचालक, आत्मा आणि अन्य पीआययू बाबत संबंधीत पीआययू, प्रमुखांनी त्यांच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मार्फत करावी.

३) प्रस्तावित मुल्यसाखळी पुर्ण होण्यासाठी अन्य योजनेतील घेतलेले घटक अथवा सीबीओनी स्वत: उभारणी करणे अपेक्षीत असलेले घटक शक्यतो पुर्ण झालेले असावेत किंवा त्यांची उभारणी करणे सुरु झालेली असावी.

४) उपप्रकल्पामध्ये प्रस्तावित केलेले प्रक्रीया युनीटसाठीचे शेड तसेच मशीनरीसाठीचे शेड बांधकामाची आवश्यकता व क्षमतेची तपासणी पीआययु, कृषि बाबत RIU नी करावी आणि अन्य पीआययू बाबत पीआययू स्तरावरुन करावी. शेड/बांधकाम घटकाची आवश्यकता व क्षमता निश्चित झाल्यानंतर SSR प्रमाणे अंदाजपत्रक व मुल्यांकनाच्या अटीवर सदर घटक मान्य करण्यात येत आहेत.

५) सीबीओमार्फत उभा करावयाच्या पायाभुत सुविधाकरीता आवश्यक विद्युत पुरवठा उपलब्धतेची खात्री पीआययूचे संबंधित जिल्हास्तरीय अधिकाऱ्याने केल्याशिवाय उपप्रकल्पाचे काम सुरु करु नये. प्रकल्प उभा राहीला आणि विद्युत पुरवठाच नाही अशी स्थिती होवू नये.

६) उपप्रकल्पामध्ये प्रस्तावित केलेल्या घटकाची रक्कम रु.१०.०० लाखाच्या आत असल्यास प्रस्तावित रक्कमेच्या ६०% अनुदान देय राहील तथापि सदर घटकाची खरेदी स्पर्धात्मक व पारदर्शकपणे करणे अनिवार्य राहील. म्हणजेच प्रस्तावित घटकाची रक्कम रु.१०.०० लाखाच्या आत असल्यास व शासकीय मापदंड उपलब्ध नसल्यास प्रत्यक्ष किंमतीच्या ६०% VGF देय राहील.

७) ज्या शासकीय मापदंडात जीएसटीचा समावेश नाही अशा बाबतीत GST पोटी होणाऱ्या खर्चाच्या (मापदंडाप्रमाणे ग्राह्य किंमतीच्या प्रमाणात) ६०% अनुदान अनुज्ञेय राहील असा निर्णय घेतला आहे.

८) उपप्रकल्पासाठी कार्यान्वन खर्च (Operating Expenditure) एकूण प्रस्तावित रक्कमेच्या ५% पर्यंत अधिकतम रुपये २०.०० लाखाच्या मर्यादेत मंजूर करण्यात येईल. तथापि हा खर्च ही ६०:४० प्रमाणात म्हणजे ६०% अनुदान व ४०% समुदाय आधारीत संस्थेचा स्व:हिस्सा याप्रमाणे राहील. आकस्मिक खर्चामध्ये उपप्रकल्पासाठी जागेच्या नोंदणीकृत भाडे करारासाठी आलेला खर्च,

उपप्रकल्पासाठी प्रस्तावित घटकासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांचा खर्च, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आलेला खर्च, आय.टी. उपकरणे, आवश्यक फर्निचर, स्मार्ट बैठकासाठी संचालकांचा प्रवास खर्च, तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्थापक / लेखापाल नेमणूक तसेच अन्य आकस्मिक खर्च इ. बाबींचा समावेश आहे.

९) प्रकल्पाची अंमलबजावणी ही संबंधीत पीआययू सोबत प्रकल्पाने विहित केलेल्या नमुन्यात Grant Agreement नंतर करावी तसेच प्रकल्पाच्या वित्तीय व्यवस्थापन पुस्तिका आणि संपादन पुस्तिकानुसार व वेळवेळी निर्गमित मार्गदर्शक सूचनानुसार करावी.

१०) या उपप्रकल्पांना समितीने मंजुरी दिली असली तरी निकषांची / अटींची पूर्तता करून घेण्याची जबाबदारी प्रकल्प राबविणाऱ्या संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेची असेल आणि अशी पूर्तता संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेमार्फत ग्रॅन्ट ॲग्रीमेंट करण्यापूर्वी होणे आवश्यक आहे.

११) मंजूर करण्यात आलेल्या उपप्रकल्पातील घटकांसाठी अनुदानाची परिगणना शासकीय योजनांच्या सध्याच्या मापदंडाप्रमाणे ग्राह्य धरून उपप्रकल्प मंजूर केले आहेत. तथापि प्रकल्पाची उभारणी करण्यापूर्वी किंवा प्रकल्प पूर्ण होण्यापूर्वी मापदंडात बदल झाल्यास त्या प्रमाणे अनुदानाची परिगणना करून अनुदान देणेबाबतचा निर्णय प्रकल्पामार्फत घेण्यात येईल. हा निर्णय पूर्णतः प्रकल्पाचा राहील.

१२) सीबीओला मंजूर प्रकल्पाच्या स्वहिस्सा निधी (४०%) बँक कर्ज घेवून उभा करावयाचा असल्यास त्यांनी तात्काळ बँकेकडे रितसर कर्ज मागणी प्रस्ताव करावा. बँकेने शासनाकडून अनुदान मिळणार असलेबाबत हा मंजूरी आदेश पुरावा म्हणून ग्राह्य धरावा. त्या अनुषंगाने सीबीओने कर्ज मंजुरीचे पत्र प्राप्त करून घ्यावे.

१३) सीबीओ स्व हिस्सा निधी स्वत: उभा करणार असेल तर स्वहिस्सा रक्कम जमा करण्यासाठी जवळच्या बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेच्या शाखेमध्ये स्वतंत्र चालू बँक खाते उघडण्यात यावे. सदर खाते सीबीओचे २ संचालक व कृषि बाबत संबंधित जिल्ह्याचे प्रकल्प संचालक आत्मा यांच्या \ संयुक्त स्वाक्षरीने करणे बंधनकारक आहे.

१४) सीबीओने ग्रॅन्ट ॲग्रीमेन्टसाठी आवश्यक कागदपत्र ३० दिवसाच्या आत प्रकल्प अंमलबजावणी कक्षास सादर करावे व सीबीओनिहाय नोडल अधिकाऱ्यांनी स्वाक्षरीत केलेले ग्रॅन्ट ॲग्रीमेन्ट व त्यासोबतची सहपत्रे स्मार्ट कार्यालयास सादर करावीत.

१५) प्रकल्पाने निर्गमित केलेल्या संपादन (खरेदी) मार्गदर्शक सुचना, संपादन पुस्तिका व सामाजिक अंमलबजावणी पुस्तिकेनुसार मंजुर घटकांची खरेदी करण्यात यावी.

१६) संबधीत समुदाय आधारीत संस्थेने CBO प्रकल्पाच्या वेळोवेळी निर्गमित मार्गदर्शक सुचनांप्रमाणे उपप्रकल्पांची अंमलबजावणी करावी.

१७) संबंधित समुदाय आधारित संस्थेने उपप्रकल्पात मंजूर केलेल्या अनुदानाचा विनियोग हा उप प्रकल्पात नमूद बाबींवरच करणे बंधनकारक आहे.

१८) उप प्रकल्पातील मंजूर बाबींवर खर्च करताना देयकाची रक्कम संबंधित विक्रेत्याला (Vendor)

रोखीने न देता संबंधिताच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात यावे.

१९) उपप्रकल्प उभारणीनंतर किमान १० वर्षे उपप्रकल्पामधून निर्माण झालेल्या बांधकाम /मशिनरी /औजारे/सुविधा/ मालमत्तेची पुर्व परवानगी शिवाय विल्हेवाट लावता येणार नाही.

२०) उपप्रकल्पास वेळोवेळी भेटी देण्यास आलेल्या अधिकारी/ कर्मचारी तसेच लेखापरीक्षक यांना सविस्तर माहिती लेखे उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

२१) उपप्रकल्प अंमलबजावणी करत असताना प्रकल्पास द्यावयाची माहिती / एमआयएस डाटा उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल.

२२) समुदाय आधारीत संस्थेने उपप्रकल्पातील एखादा घटक अपूर्ण ठेवल्यास (उदा.दालमील घटकात शेड उभारले परंतु दालमील स्थापित न केल्यास सदर घटक अपूर्ण समजण्यात येईल.) त्या अनुदानाचा बोजा संचालकांवर निश्चित करण्यात येईल व महसुल वसुली पध्दतीप्रमाणे अनुदान वसुल करण्यात येईल. तसेच अनुदानाचा गैरवापर केल्यास अनुदानाचे महसुल वसुली पध्दतीप्रमाणे संचालकांकडून वसुल करण्यात येईल.

२३) उपप्रकल्प राबवितेवेळी संबंधित समुदाय आधारीत संस्थेकडून प्रकल्पाची कोणत्याही प्रकारची दिशाभूल अथवा गैरव्यवहार होत असल्याचे प्रकल्पाच्या निदर्शनास आल्यास सदर उपप्रकल्पाचे मंजुर आदेश रद्द करण्याचे अधिकार प्रकल्पास असतील.

वरील अटी व शर्तींचे पालन करुन उपप्रकल्पाची अंमलबजावणी विहीत वेळेत करण्यात यावी.

प्रमुख
प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा, कृषि
स्मार्ट प्रकल्प तथा कृषि संचालक आत्मा
कृषि आयुक्तालय, पुणे